# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

RIGHT TO INFORMATION

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१

०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९ E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in


---

जा.क्र.राआ/महा./ २०२०/कोरोना/कामकाज परिपत्रक दिनांकः- १५-०४-२०२०

## परिपत्रक

**संदर्भः- १. राज्य आयोग परिपत्रक क्र. राआ/महा/PRO/२०२०/१३३३ दि. १६.०३.२०२०**

**२. केंद्र शासनाची अधिसुचना क्र. ४०-३/२०२०-DM-१(A) दि. २३.०३.२०२०**

**३. राज्य शासनानाची अधिसुचना क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-I, दि. २५.०३.२०२०**

**४.राज्य आयोगाचे परिपत्रक क्र. राआ/महा./२०२०/कोरोना/कामकाज परिपत्रक दि.१५.०४.२०२०**

**५. राज्य शासनानाची अधिसुचना क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-I, दि. १३.०४.२०२०**

महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूचा प्रसार दररोज वाढत असल्यामुळे वरील संदर्भिय क्र. १ अन्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व महाराष्ट्रातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये केवळ तात्काळ सुनावणी घेणे आवश्यक असलेल्या प्रकरणांचीच (Urgen Matters Only) सुनावणी घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भिय क्र. २ वरील केंद्र शासनाच्या व संदर्भिय क्र. ३ वरील राज्य शासनाच्या अधिसुचनेस अनुसरून राज्य आयोगाकडून वरील संदर्भिय क्र. ४ अन्वये महाराष्ट्रातील राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाची कार्यालये व सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाची कार्यालये दि. १४.०४.२०२० रोजीपर्यंत बंद ठेवण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

तथापि राज्य शासनाच्या वरील संदर्भिय क्र. ५ च्या अधिसुचनेनुसार राज्यातील लॉकडाऊन कालावधीमध्ये दि. ३०.०४.२०२० पर्यंत वाढ करण्यात आलेला आहे. तसेच केंद्र शासनाकडून पूर्ण देशात लॉकडाऊन कालवधी दि. ०३.०५.२०२० पर्यंत वाढविण्यात आल्याचे दि. १४.०४.२०२० रोजी जाहीर करण्यात आलेले आहे.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगास ग्राहक संरक्षण अधिनियम कलम २४(ब) द्वारे प्राप्त अधिकारानुसार सदर परिपत्रकाद्वारे सर्व वकीलवर्ग, पक्षकार तसेच सर्व संबधितांना कळविण्यात येते की, दि. ०३.०५.२०२० रोजीपर्यंत राज्य आयोगाचे मुंबई कार्यालय, नागपूर व औरंगाबाद येथील कार्यालये व राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालये बंद राहतील. तसेच केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून वरील लॉकडाऊन कालावधी वाढवण्यात आल्यास तोपर्यंत या परिपत्रकातील आदेश लागू राहतील.

( कृ.मा.प.)

राज्य आयोग मुंबई तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्याकडून तात्काळ आदेश पारित करणे आवश्यक असलेल्या प्रकरणांकरीता दि. ३१.०३.२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकातील आदेश लागू राहतील.

Sd/-
**(न्या. अ. पी. भंगाळे)**
अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण
आयोग,महाराष्ट्र मुंबई.

प्रतः-

१. मा. न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई /औरंगाबाद/नागपूर
२. मा. सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई /औरंगाबाद/नागपूर
३. मा. अध्यक्ष, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
४. मा. सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
५. प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद/नागपूर
६. प्रबंधक प्रशासन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
७. प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
८. ॲडव्होकेट बार असोसिएशन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई /औरंगाबाद/नागपूर
९. ॲडव्होकेट बार असोसिएशन, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
१०. राज्य आयोगाच्या मुंबई कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी प्रबंधक प्रशासन किंवा प्रबंधक विधी यांच्या संपर्कात रहावे. तसेच आवश्यकता असल्यास कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत आदेशित करण्यात आल्यास कार्यालयात उपस्थित रहावे .